माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या मुख्यालयाचे बळकटीकरण व विभागीय/जिल्हा माहिती कार्यालय/माहिती भवन इमारत बांधकाम या नवीन योजनेला प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः मावज-२०१७/प्र.क्र.११८/कार्या - ३४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २४ फेब्रुवारी, २०२२

वाचा -

१. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पत्र क्र.प्रविस्था-९(२०१९)/बळकटीकरण/का-१/८२३ दि.२८.०३.२०१९

प्रस्तावना -

माहिती व जनसंपर्क कार्यालयाच्या मुख्यालयाचे बळकटीकरण यामध्ये प्रसिध्दीबाबतची अद्ययावत यंत्रणा उभी करणे. आस्थापनाचे बळकटीकरण, पायाभूत सुविधांची निर्मिती इत्यादी तसेच महांसचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या विभागीय व जिल्हा माहिती कार्याकयाकडून विविध प्रसिध्दी यंत्रणद्वारे शासकीय प्रसिध्दीची जबाबदारी पार पाडली जात असून बहूतांश माहिती कायालये भाड्यांच्या जागेत असून अप्रत्यक्षपणे यांचा परिणाम कार्यालयीन कामकाजावर होतो. त्यामुळे अशा सर्व अधिनस्त माहिती कार्यालयांसाठी स्वत:ची जागा मिळवून शासकीय इमारती व माहिती भवन बांधकाम करण्यासाठी नवीन योजना कार्यान्वीत करण्या बाबतच्या प्रस्तावास दिनांक ९ फेब्रुवारी २०२२ रोजी झालेल्या मा. मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली. त्यानुसार सदर योजनेस प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

१. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या मुख्यालयाचे बळकटीकरण व विभागीय/जिल्हा माहिती कार्यालय व माहिती भवन इमारत बांधकाम ही नवीन योजना सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे.
२. या अंतर्गत मुख्यालयाचे बळकटीकरण करणे, विभागीय व जिल्हा माहिती कार्यालय तसेच माहिती भवन इत्यादीचे बांधकाम करण्यात यावे. यासाठी आवश्यक शासकीय जमीन प्राप्त

करुन इमारत बांधकामाचे प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी महासंचालनालयामार्फत उपलब्ध करुन देण्यात यावे.

३. या योजनेसाठी नवीन लेखाशिर्ष उघडण्याची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येईल.

४. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.१०७/१४४३ दि.८/७/२०१९ व वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२२०२२४१७४६१५८२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AVINDRA BHIKAJI MORYE

Digitally signed by AVINDRA BHIKAJI MORYE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=01344b08f37ac02e8488c61c468208e8d69a843917e75fef2893df71ccab0faf, pseudonym=32A2EAE514431321A37494EC2A2ADF914E132F7C, serialNumber=66EC84B6738FF47B21428AD5C3E86ED22C64FDE22957E48F885E1AB329C2660E, cn=AVINDRA BHIKAJI MORYE
Date: 2022.02.24 17:50:25 +05'30'

(अ. भि. मोरये)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव
४. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. मा.विरोधी पक्ष नेता (विधान सभा/विधान परिषद)/मा.ससद सदस्य.(महाराष्ट्र)
६. सर्व विधानपरिषद /विधानसभा सदस्य ,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
७. प्रधान सचिव, माहिती जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय,मुंबई-३२.
८. महासंचालक,माहिती जनसंपर्क महासंचालनालय ,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२
९. मा.मुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय ,मंत्रालय ,मुंबई-३२
१०. महालेखापाल लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर.
११. महालेखापाल (लेखापरिक्षा),महाराष्ट्र१/२,मुंबई/नागपूर.
१२. संचालक (माहिती) (प्रशासन) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय ,मुंबई-३२
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
१५. उपसंचालक(लेखा),माहिती जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय ,मुंबई -३२.
१६. लेखाधिकारी,माहिती जनसंपर्क महासंचालनालय ,मंत्रालय ,मुंबई-३२.
१७. कक्ष अधिकारी,कार्यासन-१४४३ नियोजन विभाग, मंत्रालय ,मुंबई-३२.
१८. कक्ष अधिकारी/व्यय-४/विनियम, वित्त विभाग ,मंत्रालय ,मुंबई-३२.
१९. निवड नस्ती/कार्या-३४, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.